**जनसंपर्क कक्ष (मुख्यमंत्री सचिवालय)**

# मंत्रिमंडळ निर्णय

**दिनांक ११ डिसेंबर, २०२५**
**(बैठक क्र.४८)**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण, २०२५ जाहीर | उद्योग |
| २ | मत्स्यव्यवसाय विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता, १३९७ पदांचा आराखडा, राज्यात ५५ कार्यालये | मत्स्यव्यवसाय |
| ३ | महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा अधिनियम, २०२४ मधील सुधारित तरतुदींना मान्यता | गृह |
| ४ | दिव्यांग, अव्यंग विवाहाच्या प्रोत्साहन अनुदानात वाढ. नवदांपत्याला दीड लाख ते अडीच लाख रूपये मिळणार | दिव्यांग कल्याण |
| ५ | वसई-विरार विकास आराखड्यातील मौजे सातिवली येथील जमिनीच्या आरक्षणात बदल | नगर विकास |
| ६ | आफ्रिका इंडिया बिझिनेस सेंटरच्या विकासासाठी एसपीव्ही स्थापन करण्यास मान्यता | नगर विकास |
| ७ | महाराष्ट्र जमीन महसूल नियम, २०२५ मध्ये सुधारणा सवलतीच्या दराने वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतरणास मुदतवाढ | महसूल व वन |

## महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण, २०२५ जाहीर

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण, २०२५ ला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणानुसार उद्योग विभागाचे नाव बदलून "उद्योग, गुंतवणूक व सेवा विभाग" असे करण्यास तसेच उद्योग संचालनालयाचे नाव "उद्योग आयुक्तालय" असे करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विकसित महाराष्ट्र, २०४७-व्हिजन डॉक्यूमेंटशी सुसंगत असे हे धोरण तयार करण्यात आले आहे. "Maharashtra 100 Initiatives for India's 100 years Independence" हे ध्येय ठेऊन या धोरणात विविध मुद्यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. यामध्ये क्षमता बांधणीकरिता इन्व्हेस्ट महाराष्ट्र (Invest Maharashtra)" हे एकसंघ डिजिटल व्यासपीठ तयार करण्यात येणार आहे. त्याद्वारे सर्व क्षेत्रांतील प्रकल्पांना एकत्रित करुन महाराष्ट्रातील गुंतवणूक प्रकल्पांचे सुव्यवस्थापन करण्यात येणार आहे. जेणेकरून, यातून संतुलित, न्याय्य आणि शाश्वत रोजगार संधी निर्माण करता येतील. राज्यभर मूल्यवर्धित औद्योगिकीकरण, प्रादेशिक विकास आणि दरडोई उत्पन्न वाढीला प्रोत्साहन देता येणार आहे. या सर्व प्रयत्नातून महाराष्ट्राला जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान (GBD) म्हणून ओळख मिळणार आहे. या धोरणानुसार सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी स्वतंत्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय (Commissionerate of MSME) निर्माण करण्यात येणार आहे. सेवा आधारित उद्योग आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या विकासाचे मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र सेवा आयुक्तालय (Commissionerate of Services) निर्माण करण्यात येणार आहे.

"इनव्हेस्ट महाराष्ट्र" या धोरणात्मक उपक्रमास कलम ८ कंपनी किंवा संस्था म्हणून मान्यता देण्यात आली असून या संस्थेकरिता ३ हजार कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या नव्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी उत्पादन व सेवा क्षेत्रातील प्रकल्पांच्या प्रोत्साहनांकरिता धोरण कालावधीसाठी १ लाख १८ हजार २७५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या बैठकीत प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यास तसेच नवीन सामुहिक प्रोत्साहन योजना-२०२५ जाहीर करण्यास मान्यता देण्यात देण्यात आली.

*****

**<u>मत्स्यव्यवसाय विभाग</u>**

## मत्स्यव्यवसाय विभागाच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता, १३९७ पदांचा आराखडा, राज्यात ५५ कार्यालये

राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागातील विविध पदांचा आढावा घेऊन तयार करण्यात आलेल्या सुधारित आकृतीबंधास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयानुसार राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ५५ मत्स्यविकास कार्यालये प्रस्तावित करण्यात आली आहेत.

मत्स्यविकास विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करताना नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा अधिक चांगल्यारितीने व जलद गतीने देता याव्यात, यासाठी या विभागाचा कालानुरूप व भविष्याचा विचार करून सुधारित आकृतीबंध तयार करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार नव्याने निर्माण करावयाच्या ३८० पदांसह १ हजार ३९७ पदांच्या आकृतीबंधास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यात १ हजार ५९ पदे नियमित तर ३३८ पदांच्या सेवा बाह्य स्रोतांद्वारे घेण्यात येणार आहेत. नव्या आकृतीबंधानुसार अतिरिक्त आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) (योजना) असे नवे पद निर्माण करण्यास तर ११ पदे रद्द करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विभागाच्या पुनर्रचनेत राज्यातील ३६ जिल्ह्यात एकूण ५५ कार्यालये प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यानुसार मोर्शी येथील मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी हे कार्यालय बंद करण्यात येणार आहे, तर ठाणे येथे सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय असे नवीन कार्यालय सुरू करण्यात येणार आहे.

*****

**<u>गृह विभाग</u>**

## महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा अधिनियम, २०२४ मधील सुधारित तरतुदींना मान्यता

राष्ट्रपती महोदयांच्या संमतीकरिता सादर करण्यात आलेले व अद्यापही प्रलंबित असलेले प्रस्तावित "महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा अधिनियम, २०२४" विधेयक मागे घेण्यास व सुधारित विधेयक सादर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यघटनेच्या कलम २५४ खंड(२) मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेले राज्याचे "महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा अधिनियम, २०२४" मा.राष्ट्रपती महोदयांच्या संमतीकरिता अद्यापही प्रलंबित असल्याने ते मागे घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच केंद्रीय गृह मंत्रालयाने निर्देशित केल्यानुसार विधि व न्याय विभागाने नवीन तरतुदी समाविष्ट करून तयार केलेल्या विधेयकाच्या सुधारित मसुद्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

*****

**दिव्यांग कल्याण विभाग**

## दिव्यांग, अव्यंग विवाहाच्या प्रोत्साहन अनुदानात वाढ.

दिव्यांगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या दिव्यांग-दिव्यांग आणि दिव्यांग-अव्यंग अशा विवाहांना प्रोत्साहन मिळावे यासाठी अनुदानाच्या रकमेत भरीव वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

प्रचलित धोरणानुसार किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास ५० हजार रूपयांचे अर्थसहाय्य देण्याची योजना आहे. यात बचत प्रमाणपत्र रोख स्वरूपात संसार उपयोगी साहित्य व वस्तूंची खरेदी, स्वागत समारंभाचा खर्च यांचा समावेश होता. त्याऐवजी आता दिव्यांग-अव्यंग विवाहासाठी १ लाख ५० हजार रूपये आणि दिव्यांग-दिव्यांग विवाहासाठी २ लाख ५० हजार रूपये अनुदान देण्यात येणार आहे. अनुदानाची ही रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त खात्यामध्ये जमा करण्यात येईल. या दांम्पत्याला यातील ५० टक्के रक्कम मुदतबंद ठेवीमध्ये ठेवावी लागेल. या योजनेसाठी वार्षिक खर्चाची तरतूद म्हणून २४ कोटी रूपयांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

*****

**नगर विभाग**

## वसई-विरार विकास आराखड्यातील मौजे सातिवली येथील जमिनीच्या आरक्षणात बदल

वसई-विरार उपप्रदेश विकास आराखड्यातील मौजे सातिवली येथील जमिनीवरील खेळाच्या मैदानाच्या काही भागावरील आरक्षण वगळून ते औद्योगिक वापराकरिता देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

वसई-विरार उपप्रदेश विकास आराखड्यातील मौजे सातिवली येथील ही ३१५६ चौ.मी.जमीन खेळाच्या मैदानासाठी आरक्षित करण्यात आली होती. त्यापैकी १०७२ चौ.मी.क्षेत्राचे आरक्षण बदलण्याबाबत वसई-विरार महानगरपालिकेने प्रस्ताव दिला होता. त्यानुसार या जमिनीवर आता औद्योगिक वापर असे आरक्षण राहणार आहे.

*****

## आफ्रिका इंडिया बिझिनेस सेंटरच्या विकासासाठी एसपीव्ही स्थापन करण्यास मान्यता

आफ्रिका-इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशनच्या प्रस्तावित आफ्रिका-इंडिया बिझिनेस सेंटरच्या उभारणीसाठी एसपीव्ही स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या एसपीव्हीमध्ये आफ्रिका-इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशनचा ७४ टक्के आणि सिडकोचा २६ टक्के भागधारकता असणार आहे.

भारत-आफ्रिका संबंध अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने आणि संपूर्ण आफ्रिकन खंडात आर्थिक, तंत्रज्ञान आणि व्यावसायिक भागिदारी वाढविण्यासाठी आफ्रिका-इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशनची स्थापना झाली. या आर्थिक सहकार्याला बळकटी देण्यासाठी पुढे सामंजस्य करारही करण्यात आला. त्यानुसार या फाऊंडेशनने व्यवसाय केंद्र उभारणीसाठी जमिनीची मागणीही केली. या व्यवसाय केंद्राच्या उभारणीत शासनाच्या वतीने सिडकोचा सहभाग राहावा, यासाठी स्पेशल पर्पज व्हेईकल-एसपीव्ही स्थापन करण्यास व त्यामध्ये २६ टक्के भागधारकता असावी, या संकल्पनेला मान्यता देण्यात आली. व्यवसाय केंद्राच्या उभारणीसाठी आवश्यक भूखंड व अन्य बाबींसाठी वेळोवेळी सिडकोला शासन मान्यता घ्यावी लागणार आहे.

*****

**<u>महसूल व वन विभाग</u>**

## महाराष्ट्र जमीन महसूल नियम, २०२५ मध्ये सुधारणा
## सवलतीच्या दराने वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतरणास मुदतवाढ

जमिनीच्या भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये सवलतीच्या दराने रुपांतरण करण्याच्या कालावधीस काही सुधारणांसह एक वर्षाची मुदतवाढ देण्यास तसेच संबंधित महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ अणि भाडेपट्टयाने / कब्जेहक्काने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करणे) नियम, २०२५ च्या मसुद्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये सवलतीच्या दराने रुपांतरण करण्याची मुदत आता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत राहणार आहे. यापूर्वी हा सवलतीचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच होता. या कालावधीत सुमारे १५ हजार १०२ रुपांतरित केलेल्या प्रकरणाद्वारे शासनास ३ हजार ७५० कोटी इतका महसूल मिळाला. तथापि, अजूनही ५ हजार २१० इतकी प्रकरणे शिल्लक आहेत. त्यामुळे या सवलत योजनेचा कालावधी एक वर्षांनी वाढविण्याचा महसूल विभागाने प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार व ४ मार्च २०२५ च्या अधिसूचनेनुसार शेती,अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक कारणांसाठी तसेच भाडेपट्टयाने किंवा कब्जेहक्काने सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात आलेल्या शासकीय जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर किंवा भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ अणि भाडेपट्टयाने / कब्जेहक्काने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम, २०२५ ला काही सुधारणांसह एक वर्षाची मुदतवाढ देण्यास व या अधिनियमाच्या मसुद्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

*****